**पोलीस अधिक्षक औरंगाबाद ग्रामीण**

| पोलीस अधिक्षक,कार्यालय | **प्रेस नोट** | दिनांक ०६.०३.२०१७<br>१९.३० |
|---|---|---|

**प्रति,**

**मा.संपादक**

**दैनिक ..........**

**विषय :–औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात दाखल /उघडकीस गुन्हयांबाबत.**

यान्वदारे आपणास सुचित करण्यात येते की, औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात दिनांक ०६.०३.२०१७ रोजी खालील प्रमाणे गुन्हे दाखल /उघडकीस आले आहेत.

**०१) पोस्टे गंगापुरः–** गुरन I ६९/१७ कलम ३५३ ३२३ ५०४ ५०६ ३४ भादवि सहकलम ७ महाराष्ट्र विद्यापीठ बोर्ड आणि परिक्षेमध्ये होणारे गैरव्यवहार व ईतर अधिनियम १९८२ प्रमाणे नमुद गुन्हयाचे फिर्यादी नामे रविंद्र यशवंतराव पागोटे वय ५० वर्ष व्यवसाय नौकरी मुक्तानंद महाविद्यालय गंगापुर रा. रत्नाकर कॉलनी प्लॉट नं. ०३ श्रीरंग गार्डन अपार्टमेंट प्लॉट नं.०६ देवगीरी कॉलेज जवळ औरंगाबाद यांनी फिर्याद दिली की दिनांक २८.०२.२०१७ १३.३०वा. दिनांक ०४. ०३.२०१७ रोजी दिनांक ०६.०३.२०१७ रोजी कार्यालयीन वेळेत यातील आरोपी नामे १) आकाश काटकर २) सागर घोडके ३) राहुल सुरासे पुर्ण नाव माहीत नाही सर्व रा. गंगापुर यांनी यातील फिर्यादी हे मुक्तानंद महाविद्यालय गंगापुर येथे ईयत्ता १२वी परिक्षा हॉल क्रं. २८ मध्ये पर्यवेक्षकाचे सरकारी काम करीत असताना यातील आ.क्रं. ०१ हा हातात नकलांच्या छायांकीत प्रती घेवुन हॉल क्रंण २८ मध्ये प्रवेश करीत असताना फिर्यादी ने त्यास अडवले असता त्याने फिर्यादीस शिविगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली व आ.क्रं. ०२ व ०३ यांना सोबत आणुन महाविद्यालयात अनाधिकृत प्रवेश करून फिर्यादी वर दबाव आणुन फिर्यादी करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा निर्माण केला व परिक्षा केंद्राच्या आवारात कॉपी बाळगताना मिळुन आला म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास श्री. मुठाळ पोउपनि पोस्टे गंगापुर हे करीत आहे.

आकस्मात मृत्युः—

**०१) पोस्टे वैजापुरः—** आ.मृ. नंबर १९/१७ कलम १७४ सिआरपीसी मधिल खबर देणार सफौ एस.बी. घुगे नेमणुक घाटी दवाखाना औरंगाबाद यांनी खबर दिली की यातील मयत नामे गयाबाई अर्जुन निकम वय ५० वर्ष रा. जरूर ता. वैजापुर हिने दिनांक ०५.०३.२०१७ रोजी १९.००वा. तीचे राहते घरी जरूर येथे काहीतरी विषारी औषध सेवन केल्याने तीस उपचार कामी वैजापुर येथे दाखल करून अधिक उपचार कामी घाटी दवाखाना औरंगाबाद येथे वार्ड क्रं. ०३ येथे दाखल केले असता ती मरण पावली वगैरे एमएलसी वरून आ.मृ. दाखल करण्यात आला असुन अधिक तपास सफौ एन.ए. घुगे पोस्टे वैजापुर हे करीत आहे.

**०२) पोस्टे सिल्लोडग्रामिणः—** आ.मृ. नंबर १०/१७ कलम १७४ सिआरपीसी मधिल खबर देणार वैद्यकीय अधिकारी उपजिल्हा रूग्णालय सिल्लोड यांनी खबर दिली की यातील मयत नामे भिमराव रामाजी घोडके वय ४० वर्ष रा. बाभुळगाव ता. सिल्लोड मौजे वडोदचाथा येथे विहीरीत पडुन पाण्यात बुडुन मरण पावला आहे व त्यास मृत अवस्थेत उपजिल्हा रूग्णालय सिल्लोड येथे दाखल केले आहे वगैरे खबरी वरून आ.मृ. दाखल करण्यात आला असुन अधिक तपास पोह/९९६ नागरगोजे पोस्टे सिल्लोडग्रामिण हे करीत आहे.

- **वाहतुक शाख व पोस्टे अंतर्गत कार्यवाही :—**

**दिनांक ०६**.०३.२०१७ रोजी औरंगाबाद ग्रामीण जिल्हा वाहतुक शखा व पोस्टे अंतर्गत केलेलया अवैध प्रावासी वाहतुक — ०२ केसेस ४०००/रू दंड, ईतर — २९ केसेस ५८००/—दंड, अशा एकुण — ३१ केसेस ९८००/रू दंड वसुल करन्यात आला आहे.

**स्वाक्षरीत**
**पोलीस अधिक्षक**
**औरंगाबाद ग्रामीण करीता**

**श्री पोउपनि सोनवणे नियंत्रण कक्ष अधिकारी औरंगाबाद ग्रामीण**